इंग्जी.
तात्पुरत्यास्वरूपात प्रथममान्यता.
विना अनुदान

(१५) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 2 APR 2009

(०६०-६९)

शिक्षणाधिकारी (माध्यमिक).
जिल्हा परिषद. शिवाजीनगर. पुणे.

[अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्रथम मान्यता]

विषय : प्रथम मान्यता ... जून -०५ पासून इ. ८ वीच्या वर्गास [२००५-०६]
संदर्भ :१. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य-९/७४८/२००९ दि. २६/३/०९
२. शा.प.क्र.नमाशा- २००६/[१५८/०६]/माशि-१ दि. १६/५/२००६
३. कार्यालयाचे पत्र क्रं.माध्य-३/१२/नमाशा/मान्यता/पुवि/२००८-०९/ दि. ७/२/२००९

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये - भिमादेवी शिक्षण संस्था, पुणे-४६ ---------- संस्थेच्या ---------- योगीराज हरिहरनंदन स्कुल धनकवडी, पुणे ---------- माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास [एक वर्षासाठी] २००५-२००६ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २००५ पासून कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे, सदर मान्यता खालील अटींची पुर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पुर्तता शाळा करीत आहे किंवा कसे ? याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

सदरची प्रथम मान्यता केवळ एक वर्षासाठीच देण्यात येत आहे. पुढील वर्षी विद्यार्थी संख्या निकष पूर्ण करुन प्रस्ताव या कार्यालयात फेर सादर करावा.

(बोल्डासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

पत्र क्रमांक विषय सदरचा यांची स्वाक्षरी आहे.

प्रत :
१. मुख्याध्यापक योगिराज हरिहरनंदन स्कुल, धनकवडी, पुणे.
२. निवडनस्ती.

President
Late Uddhavrao Tulshiram Jadhavar
Foundation, Indraprastha, Krantinagar,
Wadgaon Bk., Pune-41

145

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.जिप/माध्य-९/९९०४/०९
दिनांक १५/६/२००९

प्रति,

मुख्याध्यापक,
योगीराज हरिहरनंदन स्कुल
धनकवडी, पुणे.

**विषय** - नैसर्गीक वाढीने परवानगी देणेबाबत
२००६-०७, २००७-०८ इ.९ वी व इ.१० वी

आपल्या निनाईदेवी शिक्षण संस्था, पुणे -४६ या शैक्षणीक संस्थेव्दारा संचलीत योगीराज हरिहरनंदन स्कुल धनकवडी, पुणे या माध्यमिक विद्यालयास इ.८ वी चा वर्ग सुरु करणेस सन २००५-२००६ या शैक्षणीक वर्षापासुन मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य-३ (१२) / प्रथम मान्यता/पुवि/२००५-०६ दि.२/४/०९ अन्वये मान्यता मिळाली आहे. सन २००६-०७ या वर्षापासुन इ.९ वी व सन २००७-०८ या वर्षापासुन इ.१० वीचा वर्ग नैसर्गीक वाढीने आपल्या विदयालयात चालु झाला आहे. सदर वर्गास जून २००६ पासुन इ.९ वी व जून २००७ पासुन इ.१० वी च्या वर्गास नैसर्गीक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घ्यावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.

आपल्या माध्यमिक शाळेत इ.१० वी चा वर्ग नैसर्गीक वाढीने सुरु होत असलेने आपण मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ पुणे यांचेकडे सांकेतांक मिळणेकरीता संपर्क साधावा.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे. करिता

President
Late U... Tulshiram Jadhavar
Foun..., Indraprasth, Krantinagar,
Wadgaon Bk., Pune-41

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे/~~[illegible]~~

विषय- माध्यमिक शाळेच्या नांवात बदल करणे बाबत...

संदर्भ-१. आपले पत्र क्र [illegible]/२०१०
दि. २४/२/२०१०......................................
२.संस्था ठराव क्रमांक ..०७.. दिनांक-..११/१२/२००९

वरील संदर्भीय पत्रानुसार आपल्या कार्यालयाने शाळेच्या नांवात बदल करणेबाबतचा प्रस्ताव शिफारस करुन या कार्यालयास सादर केलेला आहे.

संस्था ठराव क्रमांक ..०७..... दिनांक ११/१२/०९ व आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता ....निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे............................ या संस्थेच्या ..हरिहरनंदन विद्यालय व ज्यो.सी.राज. हरिहरनंदन कॉलेज, धनकवडी, पुणे.. या माध्यमिक शाळेच्या नांवा ऐवजी ..एस.एम. हायस्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, धनकवडी, पुणे................ अशा बदलेलेल्या नावाची नोंद या कार्यालयाच्या रजिष्टर मधील पान क्रमांक ..८/९.......वर अनुक्रमांक ..२७....... येथे घेण्यांत आली आहे. सदर बाब सर्व संबंधितांना आपले स्तरावरुन कळवावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-करिता

करिता शिक्षण उपसंचालक
पांची स्वाक्षरी आहे.

प्रत- १) अध्यक्ष/ सचिव, ..............................................................
निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, पुणे.
२.मुख्याध्यापक,..हरिहरनंदन विद्यालय व ज्यो.सी.राज. हरिहरनंदन कॉलेज, धनकवडी, पुणे....
प्रत- विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, पुणे- ५ यांना माहितीस्तव रवाना.

३) निवडनस्ती.

Principal
S. M. High School
Jr. College, Dhankawadi,
Pune-43.

Principal
S. M. Highschool & Jr. College
Dhankawadi, Pune-43

जा.क्र. शिउसं/माध्य३-१३/शानाब/पुव/१२/२४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक: 1-3 FEB 2014

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय : शाळेच्या नावात बदल करणेबाबत**

संदर्भ : १.आपले कार्यालयीन पत्र जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/५२/१४, दि. ४-१-२०१४
२. मा.श्री. र .वि.झोपे अवर सचिव माशि-१, शालेय शिक्षण विभाग,मुंबई यांचे पत्र दि. ३.१२.१९९८

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र. १ नुसार आपण सादर केलेल्या शाळेच्या नावातील बदलाचे प्रस्तावानुसार कळविणेत येते की संदर्भीय क्रमांक २ चे शासन पत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे शाळेचे नावातील बदलाची नोंद आपल्या कार्यालयाचे नोंदवहीत घेण्यात यावी.

शाळेचे पूर्वीचे नांव : एस.एम. हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज , धनकवडी,पुणे-४३

नव्याने बदल करण्यात
आलेले शाळेचे नांव :- पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धनकवडी, पुणे-४३

सदरचा बदल आपले कार्यालयीन नोंदवही मध्ये घेण्यात यावा

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - माहितीस्तव रवाना
१. सचिव ,निनाईदेवी शिक्षण संस्था,धनकवडी,पुणे-४३
२. मुख्याध्यापक, एस.एम.हायस्कूल व ज्यु.कॉलेज,धनकवडी,पुणे-४३

मुख्याध्यापक
एस.एम.हायस्कूल
धनकवडी पुणे